


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५९ वा | शुक्रवार दि २६ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# ना भाजपसोबत, ना ठाकरेंच्या साथीला, जानकरांनी निवडला नवा मित्र, बदलणार राजकीय चित्र?

**वृत्तसंस्था/मुंबई**

राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष आणि एकेकाळी भाजपच्या सोबत असणाऱ्या महादेव जानकर यांनी काँग्रेससोबत नवी मोट बांधली आहे. आगामी महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा निवडणुका रासप काँग्रेससोबत लढणार असल्याची घोषणा जानकर यांनी बुधवारी मुंबईत पत्रकार परिषदेत केली. काही दिवसांपूर्वीच महादेव जानकर हे ठाकरेंनी मराठी निमित्ताने आयोजित केलेल्या जल्लोष मेळाव्यात दिसून आले होते. त्यानंतर जानकर महाविकास आघाडीसोबत येतील, असे बोलले जात होते. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि रासपचे महादेव जानकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत घेत या आघाडीची घोषणा केली. महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस व राष्ट्रीय समाज पक्ष एकत्र लढणार असल्याचे यावेळी जाहीर केले. यावेळी हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ङ्गमहादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लढण्याचा निर्णय झाला आहेफ महादेव जानकर म्हणाले की, ङ्गकाँग्रेसबरोबर रासपची आघाडी ३१ मे रोजीच झाली आहे. राहुल गांधी हे देशातील तरुण, महिला, आदिवासी, गोरगरीब, मागासवर्गीय यांचा आवाज बनून काम करत आहेत. जागा किती मिळणार यापेक्षा आजघडीला संविधान व लोकशाही वाचवण्याची नितांत गरज आहेफ दुसरीकडे, आगामी महापालिका निवडणुकांमध्ये भाजप-शिवसेना युतीच्या जागावाटपासंदर्भात मंगळवारी रात्री उशिरा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यात जवळपास पाच तास मॅरेथॉन चर्चा झाल्याचे समजते. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवलीसह मुंबई महानगर क्षेत्रातील महापालिकांमधील युतीच्या जागावाटपाचे सूत्र या चर्चे तून अंतिम टप्प्यात आल्याचे समजते. त्यामुळे येत्या दोन दिवसांत महायुतीच्या जागावाटपांचे सूत्र घोषित होणार असल्याचे समजते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी पहाटे ४ वाजेपर्यंत शिंदे आणि चव्हाण यांच्यात ही बैठक पार पडली. यावेळी जागावाटपाचा फॉर्म्युलाही ठरल्याचे कळते.



येत्या दोन दिवसांत स्थानिक पातळीवर प्रभागस्तरावरील उमेदवारांची चर्चा होणार असून, युतीच्या जागावाटपाची अधिकृत घोषणा लवकरच होणार असल्याचे समजते. शिवसेनेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खा. नरेश म्हस्के, सरचिटणीस राहुल शेवाळे हे या चर्चेदरम्यान उपस्थित होते.

## दोन दिवसांपूर्वीचा वाद टोकाला? शिंदेसेनेच्या मीनाक्षी शिंदेंचा तडकाफडकी राजीनामा, धक्कादायक

**वृत्तसंस्था/ ठाणे**

ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना शिवसेनेच्या माजी महापौर, महिला आघाडी ठाणे जिल्हा संघटक मीनाक्षी शिंदे यांनी गुरुवारी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिंदे यांनी हे राजीनामा पत्र पाठवले असून सध्याच्या राजकीय परिस्थितीचा विचार करून वैयक्तिक कारणास्तव हा राजीनामा देत असल्याचे त्यांनी या पत्रात नमूद केले. शिवसेना - भाजप जागावाटपाच्या चर्चे च्या फैरी अंतिम टप्प्यात असतानाच शिंदे यांच्या राजीनाम्याने खळबळ उडाली आहे. दोन दिवसांपूर्वी टेंभीनाका येथे आनंदाश्रमात पक्षातील इच्छुकांच्या मुलाखती घेण्यासाठी शिवसेनेच्या ठाण्यातील वरिष्ठ नेत्यांसमवेत शिंदे हजर होत्या. त्यानंतर गुरुवारी त्यांनी समाजमाध्यमांवर स्वतःच्या राजीनाम्याचे पत्र प्रसारित करून धक्का दिला. मीनाक्षी शिंदे प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रभाग तीन येथील मनोरमानगर भागात गेल्या काही दिवसांपासून राजकीय नाट्य रंगले होते. याच भागात ङ्गनगरसेवक स्थानिक हवाफ अशी मोहीम शिवसेनेतील काही स्थानिक कार्यकर्त्यांनी सुरू केली होती. त्यातून मनोरमानगर येथील शिवसेना शाखाप्रमुख विक्रांत वायचळ यांच्यावर गुरुवारी शिवसेना शिस्तभंग समितीच्या शिफारसीनुसार कारवाई करण्यात आली. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशावरून पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत वायचळ यांना निलंबित केल्याचे पत्र शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी प्रसिद्ध केले. त्यानंतर अवघ्या काही तासांत मीनाक्षी शिंदे यांनीही पदाचा राजीनामा



दिला. इच्छुकांच्या मुलाखतीदरम्यान शिवसेनेतील माजी लोकप्रतिनिधींमध्ये कुरबुरी झाल्याची माहिती एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले. त्यानंतर हा वाद टोकाला गेला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी माझे आत्ताच बोलणे झाले असून त्यांनी मला भेटीसाठी वेळ दिला आहे. याबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा केल्यानंतर मी अधिक माहिती देऊ शकते. तसेच कार्यकर्त्यांवर झालेल्या कारवाईप्रश्नी पक्षश्रेष्ठी योग्य तो निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया मीनाक्षी शिंदे यांनी दिली.

## घाटपुरीतील जगदंबा मंदिरात चोरी; दागिने लंपास

**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील घाटपुरी परिसरातील प्रसिद्ध जगदंबा संस्थानमध्ये चोरी झाल्याची घटना २५ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. मंदिराचे पुजारी संजय शर्मा सकाळी सुमारे ६ वाजता दर्शनासाठी मंदिरात आले असता चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने मंदिराचे विश्वस्त आणि शिवाजीनगर पोलिस ठाण्याला घटनेची माहिती दिली. प्राथमिक तपासानुसार, चोरट्याने मंदिराच्या मागील बाजूस असलेली लोखंडी खिडकी कापून आत प्रवेश केला. त्यानंतर गणपती व देवीच्या मूर्तीवरील मुकुट, डोळे, मंगळसूत्र आदी अलंकार असा अंदाजे ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. विशेष म्हणजे ही संपूर्ण घटना मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांना चोरत्वाची ओलख पटली असून, तो सराईत चोर असल्याची शक्यता व्यक्त आहे. करण्यात येत तपासात असेही समोर आले आहे की, काही महिन्यांपूर्वी घाटपुरी येथील पाण्याच्या टाकीजवळील श्री संत गजानन महाराज मंदिरात झालेल्या चोरीमध्येही हाच चोरटा सहभागी होता. तो प्रामुख्याने देवी-देवतांच्या अलंकारांवरच हात साफ करत असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. घटनेची माहिती मिळताच एसडीपीओ प्रदीप पाटील, एलसीबीचे ठाणेदार सुनील अंबुलकर, तसेच शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चोरट्याचा माग काढण्यासाठी श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. याप्रकरणी पुजारी संजय शर्मा यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजिंक्य योद्ध्याचे दुर्लक्षित समाधीस्थळ



जिथे फारसे प्रवासी जात नाहीत, किंबहुना बहुतेकांना ठाऊकही नसेल अशी आम्ही बघितलेली एक जागा म्हणजे मध्य प्रदेशच्या खरगोण जिल्ह्यातील रावेरखेडी गावातील पहिल्या बाजीरावांची समाधी. ओंकारेश्वरला जाऊन ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या कदाचित लाखात असेल, पण तिथून केवळ ४५ किलोमीटरवर असलेल्या रावेरखेडीचे नावही त्यांनी ऐकलेले नसते. अर्थात तिथे जाणे सोपे नव्हतेच. गुगल मॅपवर ही जागा दिसत नव्हती. आसपासच्या लोकांनाही मुख्य रस्त्यावरून नेमके कुठले वळण घ्यायचे ते ठाऊक नव्हते. रस्ता म्हणजे खड्डेच होते; उन्हाचा त्रासही होताच. बऱ्याच वेळाने ङ्गरावेर फाटाफ असे लिहिलेले दिसले आणि आम्ही तिथे वळलो. इथून समाधीस्थळ आठ किलोमीटरवर होते. रस्त्याचा तो शेवटचा टप्पा तर अगदी दिव्य होता; तरी जिद्दीने आम्ही ती समाधी शोधून काढली. समाधीस्थळाचा एकूण विस्तार आटोपशीर आहे. चारी बाजूंनी ओबडधोबड दगडी भिंत आहे. भिंतीच्या पिछाडीला एक अगदी पडकी धर्मशाळा आहे. मधल्या मोकळ्या जागेत तारांचे कुंपण आहे आणि कुंपणाच्या मध्यावर प्रत्यक्ष समाधीचा चौथरा आहे. चौथऱ्यावर चढण्यासाठी पाच दगडी पायऱ्या आहेत. अगदी प्रथम चौथरा, त्यावर अष्टकोनी बांधकाम आणि त्यावर षटकोनी आकारातली एखाद्या किल्ल्याच्या आकारातली गोलाकृती छत्री. त्यात अस्थी ठेवल्या गेल्या असाव्यात. मृत्यूसमयी बाजीरावांच्या जवळ असलेले त्यांचे विश्वासू सहकारी राणोजी शिंदे यांनी आसपास उपलब्ध असलेल्या दगडांचा वापर करून ही समाधी उभारली. समाधीच्या दर्शनी भागावर एक शिवलिंग कोरलेले आहे. जवळच एक राम मंदिर आणि एक शिव मंदिर बांधलेले होते, पण आता त्यांचे अवशेषच दिसतात. भारताचा सर्वश्रेष्ठ सेनापतीफ असे ज्यांचे वर्णन ब्रिटिश इतिहासकारांनी केले आहे त्या पहिला बाजीराव पेशव्यांचे इथेच १७४० साली वयाच्या अवघ्या एकोणचाळीसाव्या वर्षी निधन झाले. रणरणत्या माळवा प्रांतात मोहिमेवर असताना त्यांना उष्माघात झाला. मराठी साम्राज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेर नेण्याचे सर्वाधिक श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. थेट दिल्लीवर स्वारी करून मुघल बादशहाचे तख्त त्यांनी फोडले होते. ङ्गबारीकबारीक फांद्या छाटत बसण्यापेक्षा थेट मुळावरच घाव घातला पाहिजे; म्हणजे मग वृक्ष आपोआपच कोसळून पडेलफ हे त्यांचे उद्गार प्रसिद्ध आहेत. अलीकडे मध्य प्रदेश सरकारने समाधीस्थळाचा थोडाफार जीर्णोद्धार केला आहे पण त्या आधी कित्येक वर्षे ते पूर्ण दुर्लक्षित होते. आजही तिथे फारसे काही घडत आहे असे मला तरी दिसले नाही. एका खांबावर पुरातत्व खात्याने लटकवलेला अगदी त्रोटक माहितीचा एक जुनाट बोर्ड तेवढा होता. त्यावर फक्त नऊ छोट्या हिंदी ओळींत या महापराक्रमी सेनानीबद्दल पन्नासेक हिंदी शब्द लिहिलेले होते. तेही जेमतेम वाचता येतील इतक्या लहान अक्षरात. ङ्गजनपद पंचायत, बडवाहफ हे शब्द खाली लिहिलेले होते; त्याच पंचायतीने तो फलक लावलेला असावा. माहिती सांगण्यासाठी एकही कर्मचारी नव्हता. पर्यटकांसाठी प्रसाधनगृह वगैरे सोडाच, प्यायच्या पाण्याचीही सोय नव्हती किंवा बसायला साधा बाकही नव्हता. भोवतालच्या गवतातून आम्ही काही छोटी फुले गोळा केली आणि समाधीवर वाहिली. मिनिटभर शांत उभे राहून, हात जोडून वंदन केले आणि पायऱ्या उतरलो. शेजारी एका झाडाच्या कट्ट्यावर पाच-सहा शाळकरी मुले बसली होती. बहुधा आम्हाला तिथे आल्याचे बघूनच कुतूहलाने ती आली असावी. त्यांच्याशी झालेल्या गप्पांतून कळले की, त्या खेड्यात इंग्रजी माध्यमाची एक शाळा आहे आणि त्याच शाळेत ती शिकत होती; पण थोरल्या बाजीरावांची त्यांना काहीही माहिती नव्हती. नंतर आम्हाला बघून दोन-तीन गावकरीही समोर आले. ग्वाल्हेरच्या सिंदिया आणि इंदोरच्या होळकर कुटुंबीयांनी समाधी संरक्षित तरी ठेवली होती, असे ते सांगत होते. पूर्वी एकदा मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे इथे आले होते आणि त्यानंतर काही दिवसांनी त्यांनी या जागेच्या विकासासाठी पंचवीस-तीस कोटी रुपये मंजूरही केले होते; पण त्यानंतर प्रत्यक्षात फारशी कारवाई झाली नव्हती. समाधीस्थळाच्या पलीकडे, कुंपणापासून जेमतेम दोन-तीनशे फुटांवर नर्मदा नदीचे विशाल पात्र आहे. इथे तिला ङ्गरेवाफ असेही म्हणतात. सुदैवाने नदी बऱ्याच खालच्या स्तरावर आहे, नाहीतर पुराच्या वेळी पाणी समाधीस्थळातही येऊ शकले असते. पाच-दहा मिनिटे नदीच्या संथ प्रवाहाकडे पाहत आम्ही उभे राहिलो. आसपास चिटपाखरूही नव्हते. भर दुपारची नीरव शांतता. डोक्यात विचारांचे काहूर. ही ऐतिहासिक महत्त्वाची वास्तू अशी दुर्लक्षित पडावी याचे खूपच वाईट वाटत होते. संजय लीला भन्साळी यांच्या ङ्गबाजीराव-मस्तानीफ या गाजलेल्या चित्रपटामुळे निदान पहिल्या बाजीरावांचे नाव तरी बऱ्याच अमराठी लोकांना आता ठाऊक झाले आहे. एक योगायोग म्हणजे मस्तानीचे मूळ संस्थान पन्ना हेही मध्य प्रदेशातल्याच बुंदेलखंड भागात आहे. तेथील छत्रसाल बुंदेला यांनी मुसलमान आक्रमकांना मोठ्या शर्थीने रोखले होते. दक्षिणेत येऊन त्यांनी १६६मध्ये शिवाजी महाराजांचीही भेट घेतली होती व त्यांना गुरुस्थानी मानले होते. शिवाजी महाराजांनी त्यांना एक तलवारही भेट दिली होती. पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींमुळे ते संस्थान खूप श्रीमंत बनले होते. शिवाजी महाराजांवर ज्यांनी व्रज भाषेत ङ्गशिवराज भूषणफ हे प्रसिद्ध काव्य रचले ते कवी भूषण पन्ना दरबारचेच राजकवी होते. एकदा अलाहाबादच्या नबाबाने मोठी फौज घेऊन बुंदेलखंडावर स्वारी केली. त्यावेळी छत्रसालांचे वय ऐंशी होते, तब्येतही ठीक नसायची. त्यांनी थोरल्या बाजीरावांना पत्र लिहून मदत मागितली. ङ्गबुंदेल की राखों बाजी लाज...फ अशी विनंती करणारी एक कविताच त्यांनी आपल्या पत्रात लिहिली होती. योगायोगाने त्यावेळी बाजीराव माळव्याच्या मोहिमेवर होते. त्यामुळे तडकाफडकी ते आपल्या फौजेसह मदतीसाठी धावले. त्यांच्या मदतीने छत्रसालांनी नबाबाचा पराभव केला. विजयानंतर छत्रसालांनी बाजीराव पेशव्यांना काही दिवस तिथेच आराम करायचा आग्रह केला. छत्रसालांची पत्नी रूहानीबाई ही पर्शियन मुस्लिम होती. त्यांची मुलगी मस्तानी ही अतिशय सुंदर होती आणि उत्तम नृत्यही करायची. शाही आदरातिथ्याचा उपभोग घेत असताना समशेरबहाद्दर बाजीराव मस्तानीच्या प्रेमात पडले.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ठाकरे बंधूंची युती, तिथे खिडकीबाहेर ड्रोनच्या घिरट्या, पोलिस तपासात धक्कादायक माहिती समोर

**मुंबई :** एकीकडे ठाकरे बंधूंच्या युतीची वरळीतील हॉटेलमध्ये घोषणा झाल्यानंतर, दुसरीकडे वांद्रे येथील मातोश्री निवासस्थानाभोवती ड्रोनच्या घिरट्या सुरू होत्या. कुणी नजर तर ठेवत नाही ना, अशा संशयाची पाल मनात चुकचुकल्याने 'मातोश्री'वरून थेट पोलिसांच्या नियंत्रण कक्षात फोन गेला. मातोश्रीभोवती पोलिसांच्या सुरक्षेचे कडे असताना थेट नियंत्रण कक्षात फोन गेल्याने पोलिसही कामाला लागले. काही जणांना ताब्यात घेऊन नेमके प्रकरण तरी काय, याची रात्री उशिरापर्यंत पोलिस माहिती काढण्याचा प्रयत्न करीत होते.शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या वांद्रे खेरवाडी येथील 'मातोश्री' निवासस्थानाला राजकारणात एक वेगळे




वलय आहे. देश-विदेशातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील अनेक बड्या व्यक्ती मातोश्रीचे उंबरे चढल्या आहेत. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे वास्तव्य 'मातोश्री'मध्ये असून, आजही या वास्तूला तितकेच महत्त्व आहे. विशेष म्हणजे पोलिसांच्या दृष्टीने धोका आणि इतर बाबींचा विचार करून तितकेच सुरक्षाकवच पुरविण्यात आले आहे. असे असतानाही बुधवारी एक ड्रोन या परिसरात घिरट्या घालताना नजरेस पडले. काहीतरी संशयास्पद वाटल्याने 'मातोश्री'वरून थेट पोलिसांच्या नियंत्रण कक्षात फोन गेला.कडक पोलिस बंदोबस्त असतानाही 'मातोश्री'वरून फोन आल्याचे कळताच पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली. स्थानिक पोलिस आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून चौकशी केली असता, आजूबाजूच्या परिसरात सुरू असलेल्या एका प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी हे ड्रोन उडविल्याची माहिती मिळाली.पोलिसांनी ड्रोन उडविणाऱ्यांना ताब्यात घेतले. त्यांनी परवानगी घेतली होती का? परवानगी होती किंवा नव्हती तरी 'मातोश्री' परिसरात ड्रोन का नेण्यात आले, याबाबत रात्री उशिरापर्यंत चौकशी सुरू होती, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आले आहेत, त्यांना माझ्या शुभेच्छाच राहतील. पण, ते दोघे एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काही वेगळे घडेल असा कोणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे. ते दोघे म्हणजे मुंबई नाही आणि मराठी नाही. आम्ही म्हणजेच सर्व काही हा त्यांचा जो दुराभिमान आहे, त्यामुळेच मुंबईकर त्यांच्यापासून दूर गेले,' अशी जळजळीत टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी येथे केली.

## तिढा फडणवीसांच्या कोर्टात; उमेदवारांबाबत बैठकीत होणार निर्णय

**पुणे :** भारतीय जनता पक्षाच्या संभाव्य उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यावर अंतिम मोहोर उमटवली जाणार आहे. आमदार, माजी आमदार, माजी खासदार यांच्या कुटुंबीयांकडूनही उमेदवारी मागितली आहे. 'सर्वसाधारण' गटाचे एकच आरक्षण असलेल्या प्रभागांत इच्छुकांची संख्या जादा असल्याने उमेदवार निश्चिती करताना तिढा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांच्या उपस्थितीत आज, गुरुवारच्या बैठकीत त्यावर निर्णय घेतला जाणार असल्याचा दावा सूत्रांनी केला.भाजपच्या कोअर कमिटीची बुधवारी आपटे रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती. या बैठकीसाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, सुनील कांबळे, माजी मंत्री दिलीप कांबळे, पुण्याचे निवडणूक प्रमुख गणेश बीडकर उपस्थित होते. या बैठकीस टप्पाटप्प्याने आमदारांनी हजेरी लावून त्यांच्या मतदारसंघातील संभाव्य उमेदवारांच्या नावांवर चर्चा केली.पाटील आणि मोहोळ यांनी शहरातील सर्व आमदारांसोबत चर्चा करत त्यांच्या विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांवर सविस्तर चर्चा केली. ज्या नावांवर संघटना आणि आमदारांचे एकमत झाले, अशा उमेदवारांची नावे निश्चित केली आहेत.

काही प्रभागांमध्ये आरक्षणामुळे उमेदवारी कोणाला द्यायची, याचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यात प्रामुख्याने सूस-बाणेर-पाषाण, औंध-बोपोडी, बावधन-भुसारी कॉलनी, शंकर महाराज मठ-बिबवेवाडी, मुकुंदनगर-सॅलिसबरी पार्क, शनिवार पेठ-महात्मा फुले पेठ, शिवणे-खडकवासला, बालाजीनगर-आंबेगाव कात्रज या प्रभागांचा विषय आहे.भाजपकडून लढण्यासाठी मोठ्या संख्येने इच्छुकांनी भाजपकडे अर्ज दाखल केले आहेत.

## जगताप यांचा शरद पवारांच्या पक्षाला रामराम

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. पण दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यास शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांचा विरोध होता. अखेर त्यांनी आपल्या प्रदेशाध्यक्ष पदासह पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. यावेळी त्यांनी महत्त्वाचं स्पष्टीकरण दिलं. आपण राजीनामा दिला असला तरी राजकारण सोडणार नाही, आपण पुणे महापालिकेची निवडणूक लढवणार, असं प्रशांत जगताप यांनी जाहीर केलं आहे. त्यामुळे आता प्रशांत जगताप अपक्ष निवडणूक लढवणार की कोणत्या पक्षात प्रवेश करणार? याबाबत औत्सुकता निर्माण झाली आहे.गेल्या दहा-वीस दिवसांमध्ये वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं आहे. पक्ष निवडणूक कशी लढवेल त्या संदर्भात आम्ही सगळ्यांनी ठरवलं होतं. अगदी जाहीरनामासुद्धा तयार केलेला होता. या सगळ्या गोष्टी होत असताना बऱ्याच राजकीय अफवांना उधाण आलं होतं.

## शिंदेंच्या 'स्ट्राईक रेट'वरच स्ट्राईक करण्याची तयारी; भाई सावध..

**मुंबई :** ठाकरे बंधूंची युती झाल्यानं मुंबईत महायुती विरुद्ध ठाकरे बंधू असा थेट सामना रंगणार आहे. दोन्ही बंधूंसाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई असेल. दोघांसमोर आता सत्ताधारी भाजप आणि शिंदेसेनेचं आव्हान असेल. दोन्ही पक्षांमध्ये जागावाटपासाठी चर्चा सुरु आहे. पण अद्याप तरी कोणताही फॉर्म्युला निश्चित झालेला नाही.जागावाटपासाठी चर्चेच्या फेऱ्या सुरु आहेत. शिंदेसेनेनं पहिल्याच बैठकीत १२५ जागांची मागणी केली. १२५ जागांवर आमच्याकडे उमेदवार आहेत. अनेक माजी नगरसेवक आपल्यासोबत आहेत, असा शिंदेसेनेचा दावा आहे. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेनं ८४ जागा जिंकल्या होत्या. यातील जवळपास ५० ते ५५ माजी नगरसेवक आता शिंदेंच्या सोबत आहेत. त्यामुळे या जागा हव्यातच. २०१७ मध्ये जिंकलेल्या ८४ अधिक आणि त्यात ४१ जागांची भर घालून १२५ जागा मिळाव्यात, असं गणित शिंदेसेनेकडून मागण्यात आलं.शिंदेसेनेनं



२२७ पैकी १२५ जागांची मागणी केल्यावर भाजपनं त्यांना थेट ५२ जागांचा प्रस्ताव दिला. तो शिंदेसेनेनं अमान्य केला. त्यावर तुम्ही कोणत्या जागांवर लढणार आहात, त्याची यादी द्या. आम्ही कोणत्या जागा लढवायच्या हे तुम्ही कसं ठरवणार, असा सवाल शिंदेसेनेकडून करण्यात आला. त्यानंतर दोन्ही पक्षांनी त्यांना लढवायच्या असलेल्या जागांची यादी ठेवली. २२७ पैकी १५० जागांचा प्रश्न यातून सुटला आणि ७७ जागांवर पेच राहिला.विशेष म्हणजे उरलेल्या ४१ जागांवर भाजपला लढण्यात रस नाही. या जागा घेतल्या, तर तिथे पराभव होण्याची शक्यता अधिक आहे. त्यांनं भाजपचा स्ट्राईक रेट खराब होईल.

## मुस्लिमबहुल भागांत शिंदेसेनेचं मॅजिक; 'त्या' ४१ जागांसाठी भाजपचं लॉजिक

**मुंबई :** ठाकरे बंधूकडून अखेर युती जाहीर झालेली आहे. मुंबईत ठाकरे बंधू विरुद्ध महायुती असा सामना होणार, हे जवळपास निश्चित झालं आहे. भाजप आणि शिंदेसेना यांच्यात जागावाटपाबद्दल चर्चा सुरु आहे. पण अद्यापपर्यंत तिढा सुटलेला नाही. शिंदेसेनेनं १२५ जागा मागितलेल्या असताना भाजपनं थेट ५२ जागांचा प्रस्ताव दिल्यानं जागावाटप मार्गी लागताना दिसत नाही.२०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेनं २२७ पैकी ८४ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी शिवसेना एकसंध होती. तेव्हा भाजपनं ८२ जागांवर बाजी मारली होती. शिवसेनेत फूट पडल्यानंतर ५० ते ५५ माजी नगरसेवकांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदेसेनेत प्रवेश केला. गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या सर्व जागांसह अधिकच्या



४१ जागा, अशा एकूण १२५ जागांची मागणी शिंदेसेनेनं चर्चेच्या पहिल्याच फेरीत केली.भाजपकडून शिंदेसेनेला ५२ जागांचा प्रस्ताव देण्यात आला. तो शिंदेसेनेनं फेटाळून लावला. दोन्ही पक्षांनी त्यांना हव्या असलेल्या जागांची समोर ठेवली. त्यातून १५० जागांचा विषय मार्गी लावला. त्यामुळे आता पेच ७७ जागांचा आहे. यातील ४१ जागा मुस्लिमबहुल आहेत. त्या जागा लढवण्यास भाजप उत्सुक नाही. इथे भाजपला अनुकूल वातावरण नाही.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना एकनाथ शिंदे यांनी जाहीर केल्यानं आणि मुस्लिम महिलांनी त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतल्यामुळे मुस्लिमबहुल भागांमध्ये शिंदे यांची प्रतिमा चांगली आहे. त्यामुळे याचा फायदा त्यांना होऊ शकतो, असा एक सर्व्हे भाजपनं चर्चे दरम्यान पुढे ठेवला. पण या सर्व्हेबद्दल शिंदेसेनेत संशयाची भावना आहे. सर्व्हे दाखवून आपल्या पदरात पडेल जागा टाकल्या जात आहेत, अशी शंका शिंदेसेनेच्या नेत्यांना वाटते.मुस्लिमबहुल भागांमध्ये शिंदेसेनेचं मॅजिक चालेल, असं भाजपला वाटतं. त्यासाठी सर्व्हेचा हवाला दिला जात आहे. पण हे लॉजिक शिंदेसेनेला पटलेलं नाही. मुस्लिम समाजात शिंदेंची लोकप्रियता आहे, या सर्व्हेवर शिंदेसेनेचा विश्वास नसल्याचं दिसतं. आधी ५२ जागांचा प्रस्ताव देणाऱ्या भाजपनं शिंदेसेनेला ९० जागांचा सुधारित प्रस्ताव दिला आहे. यातील ३० जागा मुस्लिमबहुल आहेत. या जागा घेतल्यास स्ट्राईक रेट कमी होईल, अशी भीती शिंदेसेनेला वाटते.भाजपनं शिंदेसेनेला मानखुर्द, गोवंडी, भायखळा, डोंगरी या भागातील जागा सोडण्याची तयारी दर्शवली आहे. हा भाग मुस्लिमबहुल म्हणून ओळखला जातो. या भागात शिंदेसेनेला यश मिळेल, असा दावा भाजप करत असल्याची सुत्रांची माहिती आहे. दुसरीकडे शिंदेसेनेला मुंबईतील ८ विधानसभा मतदारसंघांमध्ये एकही प्रभाग सोडण्यात आलेला नाही. यामध्ये अंधेरी पूर्व, अंधेरी पश्चिम, मुलुंड, घाटकोपर पूर्व, मलबार हिल, वांद्रे पश्चिम या भागांचा समावेश आहे. या मतदारसंघांमधील सगळ्याच्या सगळ्या जागा जिंकण्याची खात्री भाजपला वाटते. इथे प्रामुख्यानं हिंदुत्त्ववादी मतदार आहे. त्यात प्रामुख्यानं अमराठी, त्यातही उत्तर भारतीयांचं प्रमाण जास्त आहे.

# २५ वर्षीय महिला पोलिसाला जाळ्यात ओढलं, लग्नाच्या आमिषाने लॉजवर अत्याचार, आरोपी दोन मुलांचा बाप..

**नागपूर :** लग्न जुळवणाऱ्या मॅट्रिमोनियल संकेतस्थळांचा गैरवापर करुन, विश्वास संपादन करत प्रेमाचे नाटक आणि लग्नाचे आमिष दाखवून तरुणींना जाळ्यात ओढण्याचे प्रकार वाढत असतानाच नागपूरमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नागपूरमध्ये कार्यरत असलेल्या २५ वर्षीय महिला पोलीस अंमलदाराची एका विवाहित तरुणाने सुनियोजित पद्धतीने फसवणूक केल्या प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणामुळे सायबर गुन्हे, ऑनलाईन ओळखी आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी असलेला ३० वर्षीय विकिन सूर्यभान फुलारे याने एका नामांकित विवाह नोंदणी संकेतस्थळावर स्वतःला अविवाहित वकील म्हणून सादर केले. याच



खोट्या ओळखीच्या आधारे त्याने महिला पोलिसाशी संपर्क साधला. सुरुवातीला चॅटिंग, त्यानंतर व्हिडीओ कॉल्स अशा माध्यमातून त्याने तिचा विश्वास संपादन केला. आपण लग्न करू इच्छित असल्याचे भासवून आरोपीने तिच्याशी भावनिक नाते निर्माण केले. ओळख दृढ झाल्यानंतर आरोपी नागपूरला आला. २८ नोव्हेंबर रोजी त्याने महिलेला लग्नाची मागणी घालून एका लॉजवर नेले. तिथे तिच्यावर अत्याचार करण्यात आला. या दरम्यान आरोपीने महिलेचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ चोरट्या पद्धतीने काढल्याचे तपासात समोर आले आहे. त्यानंतर हे फोटो-व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत त्याने महिलेला मानसिक दबावाखाली ठेवले.या भीतीचा गैरफायदा घेत आरोपीने फर्निचर खरेदी, वैयक्तिक अडचणी आणि इतर कारणे सांगत वेळोवेळी महिलेकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळले. एकूण १५ लाख ६० हजार रुपये त्याने खंडणीच्या स्वरूपात घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे.

जेव्हा पीडितेने लग्नाचा आग्रह धरला, तेव्हा आरोपीने किन्नरांकडून जिवे मारण्याची तसेच बदनामी करण्याची धमकी दिली. अखेर मानसिक त्रासाला कंटाळून महिला पोलिस कर्मचाऱ्याने लकडगंज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तपासात आरोपी आधीच विवाहित असून त्याला दोन मुले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. गंगापूर पोलिसांच्या मदतीने सापळा रचत २० डिसेंबर रोजी आरोपीला अटक करण्यात आली. या प्रकरणाने ऑनलाईन ओळखीबाबत सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## प्रेमसंबंध तुटल्यानंतर तरुणीचं प्रियकराच्या दारात गैरवर्तन

**बीड :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात एका गावात प्रेमसंबंध संपुष्टात आल्यानंतर एका तरुणीने प्रियकराच्या घरात घुसून गैरवर्तन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी संबंधित तरुणीविरोधात युसूफवडगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, या घटनेमुळे परिसरात चांगलीच चर्चा रंगली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, केज तालुक्यातील ढाकेफळ येथील एक तरुण लातूर येथे शासकीय सेवेत कार्यरत आहे. याच गावातील एका तरुणीसोबत त्याचे पूर्वीपासून मैत्रीपूर्ण संबंध होते. मात्र, नातेवाईकांच्या मध्यस्थीने दोघांमधील संबंध संपुष्टात आणण्यात आले होते. यानंतर, १४ डिसेंबर रोजी तरुणाच्या लहान भावाच्या लग्नाची सुपारी फोडण्याचा कार्यक्रम सुरू असताना, संबंधित तरुणी अचानक तरुणाच्या घरी आली आणि तिने तिथे गोंधळ घातला. उपस्थितांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला.नातेवाईकांच्या उपस्थितीत दोघांमधील संबंध पूर्णपणे संपल्याचे एक लेखी शपथपत्र देखील तयार करण्यात आले होते. मात्र, यानंतरही प्रकार थांबला नाही. अचानकपणे २२ डिसेंबर रोजी रात्री साडे आठच्या सुमारास ती तरुणी पुन्हा तरुणाच्या घरात घुसली आणि तिने दरवाजावर थुंकल्याचा आरोप तिच्यावर करण्यात आला आहे. तरुणाच्या वडिलांनी तिला जाब विचारला असता, तिने शिवीगाळ करत घर सोडणार नसल्याची धमकी दिली, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच, गंभीर परिणामांची भाषा करत ती तिथून निघून गेली, असा आरोप संबंधित तरुणीवर करण्यात आला आहे.दरम्यान, दोघांमधील प्रेमसंबंध संपुष्टात आल्याचे शपथपत्र नातेवाईकांच्या दबावातून घेतले गेले असावे, अशी चर्चा सध्या जोर धरत असल्याचे दिसून येत आहे. भविष्यात या प्रकरणातून काही अनुचित घटना घडल्यास, नोटरी आणि साक्षीदारांचीही चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारात तरुणाच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून युसूफवडगाव पोलीस ठाण्यात संशयित तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक शेंडगे आणि हेडकॉन्स्टेबल केशव खाडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## नवी मुंबईत १३ वर्षांच्या विद्यार्थिनीसोबत प्रकार

**नवी मुंबई :** नवी मुंबई येथील एका नामांकित शाळेत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका १३ वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी आणि एका विद्यार्थ्याला मारहाण केल्याप्रकरणी शाळेतील पीटी शिक्षकाला सानपाडा पोलिसांनी अटक केली आहे. अमीर खान असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या घटनेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या आरोपी शिक्षकाने ऑगस्ट २०२५ मध्ये एका १३ वर्षीय विद्यार्थ्याला मारहाण केली होती. या विद्यार्थ्याने आरोपी शिक्षकाचा एक मेसेज पीडित मुलीपर्यंत न पोहोचवल्याच्या रागातून ही मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर या शिक्षकाने ४ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास शाळा भरत असताना इयत्ता ७ वीच्या वर्गातील विद्यार्थिनीचा विनयभंग केला. तसेच याबाबत कुणालाही काही सांगू नकोस, अशी धमकीही त्याने तिला दिली. या प्रकारानंतर आरोपी शिक्षकाने पीडित मुलीचा पाठलाग करून तिला मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली होती.

## तमाशा सुरु असताना राडा, एकाला सहा जणांनी घेरलं, स्टेजवरच मारहाण

**बीड :** बीडच्या केज तालुक्यातील सोनीगावजवळ येथे म्हसोबा यात्रेच्यानिमित्त तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याचं पाहावयास मिळालं. मात्र, रात्री ११ वाजेच्या सुमारास हा कार्यक्रम सुरू असताना अचानक सुधीर प्रकाश वैरागे नावाच्या तरूणाला एका टोळक्याकडून लाकडी काठ्या आणि लाथा बुक्क्याने बेदम मारहाण करण्यात आली असल्याची घटना समोर आली आहे. या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे.व्हिडिओमध्ये दिसत आहे की, या तरुणालातमाशाच्या स्टेजवरच मारहाण करत असल्याचं दिसत आहे. या घटनेमध्ये तरूण गंभीररित्या जखमी झाला असून अंबाजोगाई येथील स्वाराती रूग्णालयात त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या तरुणाच्या नातेवाईकांनी पोलिसांत धाव घेतली. मात्र, पोलिसांकडून अद्याप कोणत्याही प्रकारे कारवाई केली गेली नसल्याचे खुद्द उपचार घेत असलेल्या तरुणाने प्रतिकिया दिली आहे. या घटनेचं नेमकं काय कारण आहे? हे अद्याप समोर आलेलं नाही.



याप्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचं सांगण्यात आलं आहे. या प्रकरणात नेमकं कोण पोलिसांवर दबाव टाकत आहेत? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.गेवराईतालुक्यातील एक काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. शेतामध्ये ऊस कापणीचे काम सुरू असतानाच एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना गेवराई तालुक्यातील सुरळेगाव येथे घडली असून, या अपघातामुळे संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.सुधाकर लहुराव आरबड (वय ४८) असं या मयत शेतकऱ्याचं नाव आहे.

# २२ किराणा दुकानाजवळ थांबलेले, जुन्या वादाची कुरापत काढली ; तरुणाला एकट्यात गाठत निर्घृणपणे संपवलं..

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील अहमदपूर शहरात पूर्ववैमनस्यातून एका २६ वर्षीय तरुणाची चाकू व काठीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी अहमदपूर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ अंतर्गत हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी दोन आरोपी जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत असून, चार आरोपी फरार आहेत. फरार आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.फिर्यादी उमेर खाजामौनोदीन बागवान आणि मयत शोएब इसाक



बागवान (वय २६, रा. बागवान गल्ली, अहमदपूर) हे रात्री सुमारे ९ वाजेच्या सुमारास अबुबकर किराणा दुकानाजवळ थांबून बोलत होते. याचवेळी मागील भांडणाची कुरापत काढून सहा आरोपींनी संगनमत करून त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने चाकू व काठीने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात शोएब बागवान गंभीर जखमी झाला आणि त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी खालील सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.सहा आरोपींपैकी दोन आरोपी गंभीर जखमी असल्यानं रुग्णालयात उपचार घेत आहेत, तर उर्वरित चार आरोपी फरार असून त्यांच्या शोधासाठी विशेष पथके कार्यरत आहेत. दरम्यान, अहमदपूरपोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध गुन्हा रजि. नं. ८३०/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३चे कलम १०३(१), ११८(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३५१(२) (३) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि पोलीस उपअधीक्षक मंगेश चव्हाण यांनी अहमदपूर पोलीस ठाण्याला भेट देत तपासाची सविस्तर माहिती घेतली. अधिकाऱ्यांनी रात्री उशिरापर्यंत अहमदपूरमध्ये थांबून घटनास्थळाची पाहणी केली. उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष केदासे, पोलीस उपनिरीक्षक रवी बुरकुले, आनंद श्रीमंगल, स्मिता जाधव तसेच कर्मचारी हनुमंत आरदवाड, तानाजी आरदवाड, बबन चपडे, चालक केंद्रे, राहुल कांबळे, भोपळे, पद्माकर पांचाळ, सतीष चव्हाण व होमगार्ड जावेद आदींनी तातडीने घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष केदासे करत आहेत.

# स्मृती मानधनाला मोठा धक्का, BCCI च्या निर्णयाने नामी संधी हुकली दहा वर्षात पहिल्यांदाच घडलं

**नवी दिल्ली :** अत्यंत प्रतिष्ठेच्या मेजर ध्यानचंद खेलरत्न क्रीडा पुरस्कारासाठी एकाही खेळाडूची शिफारस झाली नसल्याचे समजते. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार निवड समितीची बुधवारी बैठक झाली. त्यात एकाही खेळाडूची शिफारस झाली नसल्याची माहिती आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) एकाही खेळाडूची शिफारस केली नसल्यामुळे स्मृती मानधना आणि हरमनप्रीतचा खेलरत्न पुरस्कार हुकला असल्याचे बोलले जात आहे.दहा वर्षात प्रथमच एकाही भारतीय खेळाडूचा खेलरत्न पुरस्काराने गौरव होणार नाही. वर्ल्ड कप विजेत्या महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत आणि उपकर्णधार स्मृतीच्या नावाबाबत समितीच्या बैठकीत दीर्घ चर्चा झाली. मात्र, क्रिकेटपटूंना पुरस्कार देण्यासाठी आवश्यक असलेले निकष निश्चित नाहीत.क्रिकेटपटूंना राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार देण्याबाबतचे निकष निश्चित नाहीत. त्यामुळे बीसीसीआयने केलेल्या शिफारसीनुसार निर्णय घेण्यात येतो. मात्र, बीसीसीआयने या वेळी एकाही पुरुष आणि महिला खेळाडूची शिफारस केलेली नाही. याबाबतचे पत्र बीसीसीआयचे अध्यक्ष किंवा सचिवांनी पाठवलेले नाही, असे सूत्रांनी सांगितले. महंमद शमीला २०२३ मध्ये राष्ट्रीय क्रीडा पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यानंतर एकाही क्रिकेटपटूला हा पुरस्कार मिळालेला नाही.आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सातत्याने पदके जिंकणारी कम्पाउंड तिरंदाज ज्योती सुरेखालाही खेलरत्न पुरस्कारासाठी शिफारस न करण्याचा निर्णय झाला. ज्योती ही कम्पाउंडमधील तिरंदाज आहे. आतापर्यंतच्या ऑलिम्पिकमध्ये कम्पाउंड तिरंदाजीचा समावेश नाही. त्यामुळे तिची शिफारस न करण्याचे ठरले.१९९१-९२ मध्ये सुरू झालेल्या या खेलरत्न पुरस्काराने एकाही खेळाडूचा गौरव न होण्याची ही तिसरी वेळ असण्याची शक्यता आहे. यापूर्वी २००८ आणि २०१४ मध्ये हा पुरस्कार कोणासही देण्यात आला नव्हता. त्या वेळी त्यास राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार असे संबोधले जात असे. दरम्यान, विदित गुजराती आणि दिव्या देशमुख यांचा अर्जुन पुरस्काराने गौरव होण्याची दाट शक्यता आहे. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार समितीने महाराष्ट्रातील या दोघा अव्वल बुद्धिबळपटूंची या पुरस्कारासाठी शिफारस केली असल्याचे समजते. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार निवड समितीने अर्जुन पुरस्कारासाठी २४ खेळाडूंची शिफारस केली आहे. त्यात बुद्धिबळ ऑलिम्पियाड विजेता संघातील विदित आणि वर्ल्ड कप महिला स्पर्धेतील विजेती दिव्याचा समावेश आहे. त्याचबरोबर योगा या खेळासाठी प्रथमच अर्जुन पुरस्कार मिळण्याची शक्यता आहे.



# रोहित-विराटला एक, तर बुमराहला दुसरा न्याय का..

**नवी दिल्ली :** रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यावर गौतम गंभीर आल्यापासून बीसीसीआय अयोग्य वागत असल्याचे म्हटले जात आहे. कारण गौतम गंभीर आल्यापासून रोहित आणि विराट यांच्यावर आसूड ओढले गेले, त्यांची निवृत्ती पाहायला मिळाली. रोहितकडून कर्णधारपद काढून घेतले. पण त्यानंतर आता रोहित आणि विराटला एक तर जसप्रीत बुमराहला वेगळाच न्याय लावत असल्याचे पाहायला मिळाले. पण रोहित-विराटला एक आणि बुमराहला वेगळा न्याय का, हे आता बीसीसीआयने सांगितलं आहे.गौतम गंभीर आल्यापासून रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबाबत बीसीसीआय कडक भूमिका घेत असल्याचे पाहायला मिळाले. या दोघांना गौतम गंभीर यांनी बऱ्याच गोष्टी कराव्या लागल्या, पण जसप्रीत बुमराहला मात्र त्यांनी वेगळा न्याय का लावला, याचं खरं कारण आता समोर आलं आहे.भारतीय क्रिकेट बोर्डाने (बीसीसीआय) विजय हजारे वनडे क्रिकेट स्पर्धेतील किमान दोन सामने खेळण्याची सक्ती रोहित शर्मा, विराट कोहलीसह सर्व खेळाडूंवर केली आहे. मात्र, त्यातून वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला सूट दिली आहे. बुमराहवरील कार्यभार मर्यादित ठेवण्यासाठी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे. भारतीय क्रिकेट संघ ११ जानेवारीपासून सातत्याने सामने खेळणार आहे. त्या दिवशी न्यूझीलंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या आठ लढतींना (तीन वन-डे आणि पाच टी-२० ) सुरुवात होईल. त्यानंतर भारतीय संघ टी-२० वर्ल्ड कप स्पर्धा खेळणार आहे. त्यातील भारताचा पहिला सामना ७ फेब्रुवारीस मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे.



# वैभव सूर्यवंशीने मोडला एबी डिव्हिलियर्सचा सर्वात मोठा रेकॉर्ड

**नवी दिल्ली :** वैभव सूर्यवंशीची बॅट बुधवारी अशी तळपली की, त्याने थेट जगविख्यात एबी डिव्हिलियर्सचा मोठा विक्रमच मोडला आहे. वैभवने बुधवारी अशी धमाकेदार फटकेबाजी केली सर्वांची मनं तर त्याने जिंकलीच, पण थेट डिव्हिलियर्सचा वर्ल्ड रेकॉर्डही त्याने मोडीत काढला आहे.वैभव सूर्यवंशी बुधवारी मैदानात उतरला आणि त्याने सुरुवातच तुफानी फटकेबाजीने केली. वैभवे यावेळी चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. कारण वैभवने यावेळी ६४ धावा फक्त चौकारांच्या जोरावर केल्या, म्हणजेच फक्त १६ चेंडूंत त्याने हे असं अर्धशतक पूर्ण केलं होतं. पण गे तर काहीच नाही. कारण वैभवने यावेळी फक्त १५ चेंडूंच ९० धावा केल्या. कारण या सामन्यात त्याने १५ षटकार लगावले. त्यामुळे वैभवने यावेळी १५४ धावा केल्या त्या फक्त आणि फक्त ३१ चेंडूंत. वैभवने या सामन्यात आपले शतक ५९ चेंडूंत पूर्ण केले. पण वैभव त्यानंतरही थांबला नाही. शतक झळकावल्यावर त्याची फलंदाजी अधिक आक्रमक झाली. कारण त्यानंतर फक्त २५ चेंडूंच ९० धावा फटकावल्या. या सामन्यात वैभवने फक्त ८४ चेंडूंत १९० धावांची तुफानी खेळी साकारली. पण ही खेळी साकारताना वैभवने चक्क एबी डिव्हिलियर्सला मागे टाकले आहे.२०१५ साली झालेल्या वर्ल्ड कपमध्ये डिव्हिलियर्स हा भन्नाट फॉर्मात होता. या सामन्यात त्याने जलद शतकही झळकावले होते. दक्षिण आफ्रिकेचा सामना यावेळी होता तो वेस्ट इंडिजशी. एबी डिव्हिलियर्सने या सामन्यात ६४ चेंडूंत आपले शतक पूर्ण केले होते. पण वैभव सूर्यवंशीने आज झालेल्या सामन्यात फक्त ५९ चेंडूंत आपले शतक झळकावले आणि एबीचा मोठा विक्रम त्याने मोडला आहे. कारण यावेळी वैभवने एबीपेक्षा पाच चेंडू कमी खेळत आपले शतक पूर्ण केल्याचे पाहायला मिळाले आहे.वैबव सूर्यवंशी यावेळी एबी डिव्हिलियर्सवरही भारी पडल्याचे पाहायला मिळाले. कारण एबीचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधला मोठा रेकॉर्ड आता वैभव सूर्यवंशीने आज झालेल्या सामन्यात मोडल्याचे पाहायला मिळाले आहे.



# कोहलीने सचिन तेंडुलकरांचा अजून एक मोठा विक्रम मोडला

**नवी दिल्ली :** विराट कोहलीच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विराट कोहली विजय हझारे ट्रॉफीतील पहिलाच सामना खेळायला मैदानात उतरला आणि त्याने महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा मोठा रेकॉर्ड मोडला आहे. विराट कोहलीने सचिन तेंडुलकर यांचा विक्रम मोडीत काढताना आता जगभरा कोणालाच जमली नाही अशी कामगिरी करत वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.विराट कोहली हा यापूर्वीच्या वनडे मालिकेही दमदार फॉर्मात होता. विराट कोहलीने मालिकावीरही पुरस्कार पटकावला होता. विराट कोहलीने हा आपला फॉर्म कायम ठेवला आणि विजय हझारे ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावलं. विराट कोहलीने शतक पूर्ण करताच चाहत्यांनी एकच जल्लोष केला, पण त्याचबरोबर विराटने शतकासह सचिन तेंडुलकर यांचा एक मोठा विक्रम आता मोडला आहे.विराट कोहली भारतासाठी आता फक्त वनडे क्रिकेट खेळतो. टी २० आणि कसोटी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केल्यावर विराटने निवृत्ती घेतली. त्यामुळे विराट आता जास्त मैदानात दिसत नाही. त्यामुळे विराट कोहलीला पाहण्यासाठी चाहत्यांनी एकच गर्दी केली होती. विराटनेही चाहत्यांना निराश केलं नाही. विराटने शतक झळकावलं आणि सचिन तेंडुलकर यांचा एक मोठा विक्रम मोडीत काढला. यापूर्वी सचिन तेंडुलकर यांनी लिस्ट ए क्रिकेट सामन्यांत सर्वात जलद १६ हजार धावांचा पल्ला गाठला होता. सचिन यांनी ३९१ डावांमध्ये हा पल्ला पूर्ण केला होता. पण हा मोठा विक्रम आता कोहलीने मोडला आहे. कारण विराटने आता फक्त ३३० डावांमध्येच या धावा पूर्ण केल्या आणि वर्ल्ड रेकॉर्डही आपल्या नावावर केला आहे. कारण जगभरात कोणत्याही खेळाडूला फक्त ३३० लिस्ट ए सामन्यांत हा पल्ला गाठता आलेला नाही. वेस्ट इंडिजच्या गॉर्डन ग्रीनिज यांना हा पल्ला गाठण्यासाठी ४२२ सामने खेळावे लागले होते आणि त्यांचा वर्ल्ड रेकॉर्ड सचिन यांनी मोडला होता. त्यानंतर सचिन यांचा वर्ल्ड रेकॉर्ड आता विराट कोहलीने मोडला आहे.विराट कोहलीने पहिल्याच सामन्यात शतक झळकावले आणि वर्ल्ड रेकॉर्ड रचताना सचिन तेंडुलकर यांचा मोठा विक्रमही मोडीत काढला आहे.



# सूरज चव्हाणनंतर बिग बॉस फेम अभिनेता जय दुधाणे चढला बोहल्यावर



**मुंबई :** सूरज चव्हाणनंतर 'बिग बॉस मराठी' फेम अभिनेता जय दुधाणे लग्न बंधानात अडकला आहे. त्यांच्या लग्नाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. जय दुधाणेने सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि प्रसिद्ध युट्यूबर हर्षला पाटीलसोबत लग्नगाठ बांधली. त्यांच्या शाही विवाह सोहळ्याला त्यांचे बिग बॉस मराठी मधील मित्रमंडळींनी हजेरी लावली. दोघेही लग्नात सुंदर दिसत होते. त्यांच्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

जय आणि हर्षलाने लग्नात पारंपरिक लूक केला होता. जयने पिवळ्या रंगाचा डिझाइनर कुर्ता आणि धोतर नेसले होते. पिवळ्या रंगाचा फेटा बांधला होता. जयच्या कुर्त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यातील नक्षीकाम खूपच सुंदर होते. तर हर्षलाने पिवळ्या रंगाची सुंदर साडी परिधान केली होती. त्यानंतर गुलाबी रंगाचा शेला हातात होता. केसात गजरा, हातात चुडा, गळ्यात मंगळसूत्र असा साजशृंगार करून जयची नवरी नटली होती.

मार्च महिन्यात जयने मसुरी येथे निसर्गाच्या सानिध्यात गुडघ्यावर बसून हर्षला प्रपोज केले होते आणि आपल्या प्रेमाची कबुली दिली. साखरपुड्याला जय हर्षलाला रोमँटिक अंदाजात गुडघ्यावर बसून अंगठी घातली. ही दोघे खूप काळापासून एकमेकांना डेट करत होते. जय-हर्षलाचे लग्न त्यांचे मित्रमंडळी आणि कुटुंबिय यांच्या उपस्थितीत पार पडले. आता जय दुधाणे आणि हर्षला पाटील यांच्यावर चाहते, मित्रमंडळी , कलाकार यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

जय दुधाणेने अनेक रिॲलिटी शो मध्ये भाग घेतला आहे. तो 'बिग बॉस मराठी ३' मध्ये झळकला. तसेच जय दुधाणे Slitsvilla 13 चा विजेता देखील ठरला आहे. तर 'बिग बॉस मराठी ३' तो उपविजेता ठरला. तसेच त्याने 'येड लागलं प्रेमाचं' या मालिकेत काम केले आहे. चाहते आता त्याच्या लग्नाची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.जय दुधाणे हा कायम आपल्या फिटनेसकडे लक्ष देताना दिसतो.

# तुझ्यासारखी नको तूच पाहिजे..

## प्रेक्षकांच्या भेटीला येणार एक लव्हस्टोरी



**पुणे :** नवनवीन विषय आणि वेगळ्या आशयाचे चित्रपट सादर करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या झी स्टुडिओजने आता मराठी प्रेक्षकांसाठी एक स्टायलिश आणि रुबाबदार लव्हस्टोरी घेऊन येण्याची तयारी केली आहे. 'रुबाब' या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, पहिल्याच झलकितून चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. 'तुझ्यासारखी नकोः तूच पाहिजे' ही टॅगलाईन सध्या प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

टीझरमधून एका डॅशिंग आणि आत्मविश्वासू तरुणाची प्रेमकहाणी दाखवण्यात आली आहे. ही केवळ गोड प्रेमकहाणी नसून, प्रेमासाठी कोणतीही किंमत मोजायला तयार असलेल्या नायकाची रुबाबदार गोष्ट आहे. स्वतःचे नियम स्वतः ठरवणारा हा नायक आणि त्याची ड्रीम गर्ल यांची प्रेमकहाणी तरुणाईला नक्कीच भावणारी आहे. चित्रपटात भावना आणि स्वॅग यांचा योग्य समतोल साधण्यात आला असल्याचे टीझरवरून स्पष्ट होते.

बवेश जनावलेकर म्हणतात की, मराठी प्रेक्षकांना नेहमीच नवीन, फ्रेश आणि स्टायलिश आशयाची अपेक्षा असते. 'रुबाब' हा चित्रपट केवळ रोमँटिक नसून, स्वतःच्या तत्वांवर जगण्याची आणि प्रेमासाठी ठाम उभे राहण्याची कथा मांडतो.

प्रस्तुत आणि झणकर फिल्म्स निर्मित 'रुबाब' या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन शेखर बापू रणखांबे यांनी केले आहे. संजय झणकर आणि गौरी झणकर हे चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटात संभाजी ससाणे आणि शितल पाटील प्रमुख भूमिकेत झळकणार असून, 'रुबाब' हा चित्रपट येत्या ६ फेब्रुवारीपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# अक्षय खन्नाच्या गाण्यावर गौतमी पाटीलनं लगावले ठुमके



**मुंबई :** सर्वसामान्यांसोबत कलाकारही 'धुरंधर'च्या गाण्याचा ट्रेंड फॉलो करताना दिसत आहे. 'धुरंधर' चित्रपटातील अक्षय खन्नाचे ऋर९श्रर गाणे सध्या सोशल मीडियावर तुफान गाजत आहे. तर गाण्यातील अक्षय खन्नाची हुक स्टेप प्रंचड व्हायरल होत आहे. अलिकडेच बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीने देखील या गाण्यावर भन्नाट डान्स केला होता. नृत्यांगना गौतमी पाटीलला देखील अक्षय खन्नाच्या गाण्याची भुरळ पडली आहे. तिने Fa9la गाण्यावर भन्नाट डान्स केला आहे. गौतमी पाटील धुरंधर चित्रपटातील अक्षय खन्नाच्या षर९श्रर गाण्यावर डान्स करताना दिसली. गाण्यातील अक्षय खन्नाची व्हायरल हुक स्टेप तिने केली. गौतमीचा स्वॅग खूपच भारी वाटत होता. गौतमीने रस्त्याच्या बाजूला ही डान्स रील शूट केली आहे. ज्याचा व्हिडीओ तिने शेअर केला आहे. साध्या सिंपल कपड्यात गौतमी क्यूट दिसत आहे. मोकळे केस आणि डोळ्यांना गॉगल लावून ती खूप स्टायलिश अंदाजात नाचताना दिसतेय. तिच्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांकडून कमेंट्सचा वर्षाव होत आहे.

# आणखी एक स्टारकिड बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार; १८ व्या वर्षी चित्रपटात झळकणार? सौंदर्यावर चाहते फिदा

**पुणे :** बॉलिवूड अभिनेत्री महिमा चौधरीची मुलगी अरियाना चौधरी कायम कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. तिच्या सौंदर्याचे चाहते दिवाने आहेत. ती सोशल मीडियावर सक्रिय असते. अरियाना 'नादानियां' चित्रपटाच्या प्रीमियरमध्ये दिसली होती आणि तेव्हापासून ती खूप चर्चेत आहे. अशात आता महिमाने अरियानाच्या बॉलिवूड पदार्पणाबद्दल मोठा खुलासा केला आहे.

फिल्मी ज्ञानच्या मुलाखतीत महिमा चौधरी मुलीच्या बॉलिवूड पदार्पणाबद्दल बोलली की, 'लवकरच नाही, पण हो बॉलिवूडमध्ये येईल... मला चित्रपट आवडतात. मला क्रिएटिविटी आवडते आणि ती माझ्या इतिहासाचा एक भाग व्हावी अशी माझी इच्छा आहे. मला ते खूप आवडते कारण मला वाटते की माझ्या आयुष्यात मी हा सेटअप निर्माण केला आहे. आणि मुंबईपेक्षा चांगले काहीही नाही. म्हणून, मी तिलाही येथे राहायचे आहे.'

फिल्मी ज्ञान सोबतच्या संभाषणात, महिमा तिच्या मुलीबद्दल बोलली. तिने एरियानाच्या बॉलिवूड पदार्पणाबद्दलही भाष्य केले. ती म्हणाली, 'लवकरच नाही. पण हो. मला चित्रपट आवडतात.' मला सर्जनशीलता आवडते आणि ती माझ्या इतिहासाचा एक भाग बनवायची आहे. मी जो आयुष्यात सेटअप केला आहे. तो येथेच केला आहे. मुंबईपेक्षा चांगले काहीही नाही. म्हणून मला वाटते की तिने इथेच राहावे...' २००७ मध्ये जन्मलेली अरियाना आता १८ वर्षांची आहे. तिने नुकतीच हायस्कूलमधून पदवी प्राप्त केली आहे.

महिमा चौधरी अलीकडेच 'दुर्लभ प्रसाद की दूसरी शादी' या चित्रपटात दिसली. चित्रपटात ती संजय मिश्रा यांच्यासोबत झळकली. यापूर्वी 'नादानियां' चित्रपटात दिसली होती, ज्यामध्ये तिने खुशी कपूरच्या ऑनस्क्रीन आईची भूमिका केली होती. महिमा चौधरीने आजवर अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिचे लाखो चाहते दिवाने आहेत.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नायलॉन मांजाविरोधात कठोर दंडात्मक कारवाई प्रस्तावित



**जनसंचलन/बुलढाणा**

नायलॉन मांजाच्या वाढत्या वापरामुळे होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कडक भूमिका घेतली आहे. न्यायालयाने सुमोटो जनहित याचिकेमधील २४ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार नायलॉन मांजाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी पुन्हा एकदा कठोर निर्देश दिले असून, त्यानुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून सर्वसामान्य जनतेसाठी सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे.

सन २०२१ पासून नायलॉन मांजावर बंदी असूनही प्रत्यक्षात फारसा बदल झालेला नाही. आजही सर्रासपणे नायलॉन मांजाचा वापर सुरू असल्याने दरवर्षी अनेक नागरिक जखमी होत आहेत, तर काहींना जीवही गमवावा लागत आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. नायलॉन मांजाचा वापर करणारे तसेच त्याची विक्री करणारे विक्रेते बंदीबाबतच्या नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, न्यायालयीन आदेशांची व्यापक प्रसिद्धी प्रमुख वृत्तपत्रांतून झालेली असल्याने, या धोकादायक मांजाच्या परिणामांबाबत सर्वांना माहिती आहे. या पार्श्वभूमीवर, मा. उच्च न्यायालयाने कठोर कारवाईपूर्वी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या वतीने सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे.

या सूचनेनुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्याच्या पालकांना ५० हजार रुपयांचा दंड न्यायालयात जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, प्रौढ व्यक्ती नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास, त्या व्यक्तीला न्यायालयात ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, तसेच नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून साठा जप्त झाल्यास, प्रत्येक उल्लंघनासाठी न्यायालयात २ लाख ५० हजार रुपयांचा दंड जमा करण्याचे निर्देश का देऊ नयेत, अशा सूचना जारी करण्यात आल्या आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ जानेवारी २०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे होणार आहे. ज्यांना प्रस्तावित कारवाईविरोधात निवेदन सादर करायचे आहे, त्यांनी सुनावणीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सुनावणीदरम्यान कोणीही हजर न राहिल्यास किंवा निवेदन न सादर केल्यास, नायलॉन मांजाच्या वापरकर्त्यांकडून व विक्रेत्यांकडून दंड वसूल करण्यास सर्वसामान्य जनतेचा कोणताही आक्षेप नाही, असे गृहीत धरले जाईल, असेही सूचनेत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रस्तावित कारवाई संदर्भात निवेदन किंवा आक्षेप असल्यास सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर धडक कारवाई...

## ८ टिप्पर जप्त, १ कोटी ६२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात ; ८ आरोपींवर गुन्हा दाखल

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात प्रशासनाच्या धडक कारवाया सुरु आहेत. मलकापूर तालुक्यातील मौजा नरवेल परिसरातील पूर्णा नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ८ टिप्पर व १६ ब्रॉस वाळू जप्त करण्यात आली असून, एकूण अंदाजे १ कोटी ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी ८ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या आदेशानुसार आणि उपविभागीय अधिकारी मलकापूर संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाने बुधवारी सायंकाळच्या सुमारास केली आहे. दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास, पोलीस स्टेशन एमआयडीसी मलकापूर हद्दीतील नरवेल कोटेश्वर मंदिर शिवार येथे पेट्रोलिंग सुरू असताना जमुनापुरी घाटातून मलकापूरकडे शासनाचा महसूल बुडवून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तहसीलदार व महसूल कर्मचाऱ्यांसह पंचांना सोबत घेऊन नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयास्पदरीत्या येणारी ८ टिप्पर वाहने थांबवून तपासणी केली असता, चालकांकडे वाळू वाहतुकीसाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचे आढळून आले. पंचासमक्ष तपासणीमध्ये प्रत्येकी सुमारे २ ब्रॉस वाळू असे एकूण १६ ब्रॉस वाळू (अंदाजे किंमत २ लाख रुपये) तसेच प्रत्येकी अंदाजे २० लाख रुपये किमतीची ८ टिप्पर वाहने जप्त करण्यात आली. अशा प्रकारे वाळू व वाहनांसह १ कोटी ६२ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी पो.स्टे. एमआयडीसी दसरखेड भाग-०५, गुन्हा अप. क्र. १७५/२०२५ अन्वये कलम ३०३(२) भान्यासं सह कलम २१(१), २१(२) गौण खनिज अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये मलकापूर येथील ६ जण, नांदुरा आणि मोताळा येथील एका जणाचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या टिप्पर वाहनांचे क्रमांक -२८--६१७४/ २८९५/ ४४१४/ ४१७२/ १२१०/ ८९१०/ ७९३५ / ७३९७ असे आहेत. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर कारवाई यापुढेही सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# रब्बी हंगाम ई-पीक पाहणीस प्रारंभ....

## शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन; २४ जानेवारीपर्यंत मुदत

## नोंदणीअभावी पीक विमा व अनुदानास अडचणी

**जनसंचलन/बुलढाणा**

यंदाच्या रब्बी हंगाम ई-पीक पाहणी उपक्रमाची सुरुवात १० डिसेंबरपासून करण्यात आली असून, या अंतर्गत शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा स्वतः अँड्रॉईड मोबाईलद्वारे नोंदवणे बंधनकारक आहे. शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणीची अंतिम मुदत २४ जानेवारी २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे.

रब्बी हंगाम २०२५ ई-पीक पाहणी अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजपर्यंत ३४,७४३.७१ हेक्टर क्षेत्रावर पीक नोंद झाली असून, एकूण ७,९९,१९५ मालक प्लॉटपैकी ३१,००२ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी डीसीएस व्हर्जन ४.०.५ या मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी केली आहे. आतापर्यंत जिल्ह्यात केवळ १५.२९ टक्के क्षेत्रावरच ई-पीक पाहणीची नोंदणी पूर्ण झाली असून, उर्वरित क्षेत्रावर अद्याप नोंदणी होणे बाकी आहे.

ई-पीक पाहणीसाठी अँड्रॉईड मोबाईल आवश्यक असून, शेतकऱ्यांनी गुगल क्रोम अपडेट करून ई-पीक पाहणी व्हर्जन ४.०.५ ॲप मोबाईलमध्ये इन्स्टॉल करावे. शेत बांधावर जाऊन प्रत्यक्ष पीक स्थितीची नोंद करून माहिती अपलोड करणे अपेक्षित आहे. ज्या शेतकऱ्यांकडे मोबाईल उपलब्ध नाही किंवा ॲप हाताळण्यात अडचण येत आहे, त्यांनी संबंधित गावचे तलाठी, कोतवाल, डी सीएस साठी नियुक्त सहाय्यक, तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) यांची मदत घेऊन आपल्या पिकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.




ई-पीक पाहणीद्वारे पीक नोंदणी न केल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा कोरा राहणार असून, नंतर तो भरता येणार नाही. त्यामुळे पीक विमा, शासकीय अनुदाने व विविध लाभ मिळविताना अडचणी निर्माण होऊ शकतात. विशेषतः अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास पीक विमा मिळविण्यासाठी ७/१२ वर अचूक पीक नोंद असणे अत्यावश्यक आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६ पूर्वी अनिवार्यपणे आपल्या पिकांची ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बनावट प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक

**जनसंचलन/बुलढाणा**

शेगाव जिगाव प्रकल्पांतर्गत रस्ता बांधकामाची निविदा घेण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या अनुभव प्रमाणपत्रात ८० लाख रुपयांच्या कामाची किंमत तब्बल ५ कोटी ८० लाख रुपये दाखवून खोटे दस्तऐवज सादर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध शेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या पोलिसांकडून माहितीनुसार, जिगाव प्रकल्पांतर्गत धरणाच्या खालील बाजूस रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी १५ कोटी ६३ लाख रुपये किमतीची ऑनलाइन निविदा प्रक्रिया राबविण्यात लि., आली होती. ही प्रक्रिया १४ ते २९ ऑगस्ट २०२३ दरम्यान राबविण्यात आली. याकरिता मे. निलेश इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. नंदुरबारच्या वतीने निविदा सादर करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेतील कागदपत्रांची पडताळणी करताना कंत्राटदाराने निविदेत चाळीसगाव नगर परिषद कार्यालयाचे रस्त्याच्या बांधकामाच्या जोडलेल्या प्रमाणपत्राबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना संशयास्पद बाबी आढळून कोटी ६३ लाख रुपये किंमतीची निविदा प्रक्रिया राबविली. आल्या. त्यानंतर सखोल चौकशी केली असता, किमतीत मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकारामुळे शासनाची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचे निष्कर्ष काढण्यात आले. याप्रकरणी जिगाव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभागांतर्गत जिगाव धरण उपविभाग, शेगाव येथील सहाय्यक अभियंता उमेश भाऊराव पाचपोर यांनी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. यावरून आरोपी कंत्राटदार विलास शंकरराव पाटील (रा. नंदुरबार) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ४२०, ४६८, ४७१ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक संदीप बारींगे करीत आहेत.

# प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करताना अकोल्याकडे जाणारे वाहन पकडले!

**जनसंचलन/ खामगाव**

उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने मलकापूरकडून अकोल्याकडे जाणाऱ्या मालवाहक वाहनावर कारवाई करत प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूसह एकूण ३३ लाख ४६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई गुरुवार, २५ डिसेंबर रोजी सकाळी नांदुरा रोडवर करण्यात आली. याप्रकरणी ताब्यात वाहनचालकास घेण्यात आले असून, खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालवाहक वाहन क्रमांक एम. पी. ०९ जीएस ८१६५ मधून प्रतिबंधित गुटखा त सुगंधित तंबाखूची वाहतूक होत असल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाली होती. पथकातील सहायक पोलिस उपनिरीक्षक सुनील राऊत व सुधाकर थोरात यांनी नांदुरा रोडवर वाहन थांबवून तपासणी केली.




वाहनात ५० पोत्यांमध्ये प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू आढळून आला. जप्त आलेल्या करण्यात तंबाखूजन्य पदार्थांची किंमत २२ लाख ४६ हजार ४०० रुपये आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

(गुंतवणुक रक्कम)

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... **सुकन्या** लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

**दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली**

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन !

**जनसंचलन/ नांदुरा**



श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात कृषिरत्न भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती महोत्सवाला सुरुवात झाली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांचा १२७ वा जयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. त्यासाठी महाविद्यालयात २५ डिसेंबर ते २७ डिसेंबर दरम्यान विविध सांस्कृतिक आणि पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषिरत्न डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तीन दिवसीय जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २५ डिसेंबर रोजी सकाळी ध्वजारोहण त्यानंतर डिश डेकोरेशन, ग्रंथ प्रदर्शनी, औषधी वनस्पती प्रदर्शनी रांगोळी स्पर्धा पुष्प प्रदर्शनी, संशोधन केंद्राचे उद्घाटन, उद्घाटन समारंभ, पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यावर व्याख्यान, क्रीडा स्पर्धा तर २६ डिसेंबर रोजी भावगीत स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, बक्षीस वितरण व समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ डिसेंबर रोजी अभिवादन सोहळा आणि प्रभात फेरी काढून पंजाबराव देशमुख यांना अभिवादन करण्यात येणार आहे. या जयंती सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी मेहनत घेत आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. करमसिंग राजपूत यांनी दिली आहे.

# मुलगा न झाल्याने सासरच्यांकडून छळ; महिलेची आत्महत्या!



**जनसंचलन/ लोणार**

लोणार तालुक्यातील वढव येथे सासरच्या मंडळींकडून सातत्याने होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून एका विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना २४ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे तीन वाजता घडली. या प्रकरणी माहेरच्या तक्रारीवरून पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कांचन अमोल सोनुने (वय २४) असे मृत महिलेचे नाव आहे फिर्यादी नंदाबाई भीमराव घुगे (वय ४५, रा. असोला, ता. जितूर, जि. परभणी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मुलीस तुला मुलगा झाला नाही, तू घराला वंशाचा दिवा दिला नाही असे म्हणत वारंवार हिणवले जात होते. यावरून आरोपींकडून तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यात येत होता. तसेच वेळोवेळी मारहाण, चारित्र्यावर संशय घेणे व पैशांची मागणी केली जात होती. मात्र फिर्यादी गरीब असल्याने पैशांची मागणी पूर्ण होऊ शकली नाही. या सततच्या छळामुळे विवाहितेचा मानसिक तणाव वाढत गेला. अखेर तिने वढव येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी अमोल विश्वनाथ सोनुने, विश्वनाथ रामा सोनुने, रामकोर विश्वनाथ सोनुने (रा. वढव, ता. लोणार), सोनु कागणे (रा. पहूर, ता. लोणार) व शिवकन्या आघाव (रा. बोरखेडी, ता. रिसोड, जि. वाशीम) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक गणेश इंगोले व सहाय्यक फौजदार गजानन घोंगडे करीत आहेत.